2019-2020

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

February 2020 Special Issue-23 Vol.2

## The Role of Language and Literature in Unity in Diversity

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal, Dr.Aqueela Syed Gous**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 23, Vol. 2 February 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

डॉ.सुधाकर पं.बोथीकर, 127

49. "जलसंवर्धन : एक भौगोलिक अभ्यास"

प्रा.डॉ. सुधाकर विठ्ठलराव वनवे 130

50. जागतिकीकरण आणि ग्रामीण कविता

प्रा.डॉ. आशा सोपान गिरी 132

51. भाषा आणि माध्यमे

प्रा.डॉ. लहू दिगंबर वाघमारे 135

52. रामायणातील पर्यावरण आणि मानवी जीवन

प्रा. घाडगे शंकर धारबा 137

53. मराठी भाषा आणि लिखित प्रसारमाध्यमे

प्रा.पंकज पवार 140

54. मराठी कवितेतील जागतिकीकरणाच्या प्रतिमा

प्रा.डॉ.पद्माकर आ.पिटले 144

55. आजचे स्तंभलेखन : स्वरूप, वैशिष्ट्य

प्रा.डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे, 146

56. जागतिकीकरण आणि लोकसाहित्य

प्रा. पोकळे आबासाहेब नवनाथ 149

57. प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा

प्रा.डॉ. संगीता दत्ताजी मोरे 152

58. 'जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य'

प्रा. अहिरे रविंद्र महारू 154

59. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य

प्रा.डॉ.कांबळे बी.व्ही. 156

60. मराठी भाषा आणि साहित्य

प्रा. डॉ. पौर्णिमा बोडके 158

61. समाज माध्यमं आणि ई-मराठीचे संवर्धन

प्रा.डॉ.राहुल राजाराम हांडे, 161

62. ग्रामीण कवितेची भाषा

डॉ कार्तिकी नांगरे 164

63. भाषा आणि वाङ्मयः एक सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध

डॉ. रुद्देवाड बी.पी.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 23 Vol. 2 February 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# "जलसंवर्धन : एक भौगोलिक अभ्यास"

**प्रा.डॉ. सुधाकर विठ्ठलराव वनवे**

भूगोल विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

**सारांश :-**

जगात लोकसंख्यावाढीमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचे शोषण वाढत आहे. पडणाऱ्या पर्जन्याचे प्रमाण सर्वत्र सारखे नाही. जगातील अनेक देशात पर्जन्य जास्त पडतो तर काही देशात अत्यंत अल्प पडतो. आज जगातील ४० टक्के लोकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही. ८० टक्के आजार केवळ दूषित पाण्यामुळे होतात. नैसर्गिक साधन संपत्ती ही निसर्गाने मानवाला दिलेली अमूल्य भेट आहे. तिचा शोध घेऊन तिच्या उपभोगात आपल सुख घेण्याचा व पाहण्याचा मानव सतत प्रयत्न करत असतो. त्यातच तो नैसर्गिक साधनसंपदेला मर्यादा आहे विसरुन जातो व आपल्या स्वार्थासाठी आपल्या अमर्याद गरजा वाढवतो. त्यावेळी त्या साधनसंपदेवर येणारा ताण व तिचा होणारा क्षय भविष्यात मानवाला चिंताग्रस्त व समस्या निर्माण करणारा आहे. त्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनियोग विवेकपूर्ण केला पाहिजे. यातूनच संवर्धन ही संकल्पना उदयास आली आणि तिचच एक मोठ अपत्य म्हणजे जलसंवर्धन होय.

पाणी ही सजिवांच्या अनेक गरजांपैकी सर्वात महत्त्वाची अशी मुलभूत गरज आहे. निसर्ग ही गरज भागविण्याचे कार्ये अतिशय प्रामाणिकपणे पार पाडत असतो. मानवी जीवनात पाण्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. पाण्याचा वापर पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी, जलवाहतूक, उद्योग, जलसिंचन, पशूपालन, जलविद्युत इ. विविध कार्यासाठी होता. भारतामध्ये सरासरी ९५६.१ मि.मी. पर्जन्यमान होते पण अतिरिक्त लोकसंख्येमुळे पाण्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे जलसंवर्धन आवश्यक आहे.

**बीजसंज्ञा :-** जलसंवर्धन, समस्या, उपाय.

**१) प्रस्तावना :-**

पाणी ही मानवाला जगण्यासाठी आवश्यक आहे. मानव, प्राणी, पक्षी, वनस्पती इत्यादीसाठी पाण्याचे असणारे महत्त्व शब्दांकित करणे अशक्य. पाण्याचे भरपूर अस्तित्त्व असणारा आपल्या सूर्यमालेत 'पृथ्वी' हा एकमेव ग्रह आहे. पृथ्वीच्या ७१ टक्के भागावर पाणी असून २९ टक्के भाग जमिनीचा आहे. एकूण पाण्यापैकी ९८ टक्के पाणी क्षारयुक्त असून केवळ २ टक्केच पाणी गोड्यापाण्याच्या स्वरुपात आहे. त्या दोन टक्के गोड्यापाण्यापैकी ८७ टक्के पाणी बर्फाच्या स्वरुपात आहे हे खालील तक्त्यावरुन लक्षात येईल.

| | |
|---|---|
| सागरजल | ९७.१ टक्के |
| हिमस्वरुपात | २.१ टक्के |
| भूपृष्ठजल | ०.२ टक्के |
| भूगर्भजल | ०.६ टक्के |
| **एकूण जल** | **१०० टक्के** |

यामध्ये पुन्हा काही पाण्याचे प्रमाण बाष्परुपाने वातावरणात असते तर काही पाणी सजिवांच्या शरीरात असते. म्हणजेच फक्त ०.९ टक्के एवढेच पाणी प्रत्यक्ष वापरास उपयुक्त आहे. हे प्रमाण अत्यंत अल्प आहे. त्यातच नियमित लोकसंख्या वाढ आणि पाण्याचे विषम वितरणामुळे अनेक जलसमस्या निर्माण होत आहेत. शेती, कारखानदारी, पिण्याचे पाणी, घरगुती वापरासाठी पाणी, उद्योग इ. मध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. पाण्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे समस्या निर्माण होत आहेत. त्यासाठी पाण्याचे संरक्षण व संवर्धन होणे आवश्यक आहे.

**२) माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती :-**

सदरील संशोधन लेख हा द्वितीयक स्त्रोतावर आधारलेला असून यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, मासिके इ. चा वापर करण्यात आला आहे.

**३) उद्दिष्ट्ये :-**

अ. जलसंवर्धनात्मक उपाय अभ्यासणे.

ब. जलसंवर्धनाचे महत्त्व विशद करणे.

**४) विषय विवेचन :-**

**अ) संवर्धन व्याख्या :-**

**I)** निसर्ग व त्यातील संपदा यांचे रक्षण करुन वृद्धी करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करणे म्हणजे संवर्धन होय.

**II)** संवर्धन म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीचे उदा. पाण्याचे भावी पिढीच्या संपन्नतेसाठी आणि लाभासाठी सावधानपूर्वक केलेले नियंत्रण आणि प्रबंधाच्याद्वारे विनाशापासून परिरक्षण किंवा संरक्षण म्हणजेच संवर्धन होय.

**ब) जलसंवर्धनात्मक उपाय :-**

पृथ्वीवर पाण्याच्या वाढत्या उपभोगामुळे भविष्यकाळात मानवाला पाण्याच्या कमतरतेला तोंड द्यावे लागेल म्हणून पाण्याच्या संवर्धनासाठी पाण्याच्या उपभोगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तसेच पाणाच्या संवर्धनाचे उपाय योजना आवश्यक आहेत.

I) भूमिगत पाण्याची पातळी वाढविण्यासाठी वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. कारण वृक्षांची मूळे पाणी शोषण करतात व जमिनीत पाण्याचे संचयन होते. वनस्पतीचे आवरण असलेल्या प्रदेशात पावसाच्या पाण्याबरोबर पोषक जैविक पदार्थ पण जमिनीत पुरतात व जलसंवर्धन होण्यास मदत होते.

**II) पाण्याचे पुर्नवितरण :-**

काही ठिकाणी पाणी मोठ्या प्रमाणात असते तर काही ठिकाणी अत्यंत अल्प प्रमाणात असते म्हणून पाण्याचे पुर्नवितरण करणे आवश्यक असते. नदीच्या पाण्याचे पुर्नवितरण दोन प्रकारे केले जाते.

**१) जलाशय :-**

नदीवर बांध बांधून पुराचे नियंत्रण केले जाते व ते पाणी जलाशयात एकत्रित करुन नदीप्रवाहावर नियंत्रण ठेवता येते आणि ज्यावेळी पाण्याची कमतरता भासेल तेव्हा जलाशयातील पाणी पिण्यासाठी व सिंचनासाठी त्या क्षेत्रात पुरविले जाते. त्याचप्रमाणे जलाशयाद्वारे विद्युत निर्माण करुन विद्युत समस्या सोडविता येते. तसेच जलसिंचनासाठी जल उपलब्ध होते, तेथे मत्स्य व्यवसाय करता येतो. त्याचप्रमाणे उद्योगधंदे व शहरांना पाणी पुरवठा जलाशयाद्वारे केला जातो. हे जरी काही प्रमाणात दोषयुक्त असले तरी यात फायदा अधिक आहे.

**२) कालवे :-**

कालव्याद्वारे पाणी जास्त असलेल्या भागातून कमी असलेल्या भागाकडे वळवले जाते. म्हणजे पाणी टंचाई असलेल्या भागातील गरज भागवली जाते. यामुळे टंचाईग्रस्त भागाला नवजीवन निर्माण होते. तसेच कालव्याचा जलवाहतूकीसाठी सुद्धा उपयोग होतो. म्हणूनच कालव्यांना कृत्रिम नद्या असे म्हटले जाते.

**III) भूमिगत पाण्याचा समजसपणे उपयोग :-**

पृथ्वीवर सध्या बहुतांशी देशात पाण्याची गरज भूमिगत पाण्याद्वारे भागवली जाते. म्हणून भूमिगत पाण्याचा उपयोग समंजसपणे करता आला तर पावसाच्या पाण्याची कमतरता भरुन काढता येईल. जगातील अधिकतम देशात सिंचनाखाली भूमिगत पाण्याचा उपयोग केला जात आहे. उदाहरण द्यायचे झाले तर रशियात २० टक्के, संयुक्त संस्थानात २० टक्के व भारतात ६६ टक्के कृषीयोग्य जमिनीला पाण्याचा पुरवठा भूमिगत पाण्याद्वारे केला जातो. मोठ्या प्रमाणात होणाऱ्या या पाण्याच्या शोषणामुळे संयुक्त संस्थाने, मेक्सिको, ऑस्ट्रेलिया, लिबीया आणि इस्त्रायल इ. देशात प्रतिकूल परिणाम दिसून येत आहेत. म्हणून भूमिगत पाण्याचे शोषण नियंत्रित करणे आवश्यक आहे. नाही तर जमीन खचणे, भूमिगत पाण्याची पातळी कमी होते हे परिणाम भोगावे लागतील. यासाठी जलसंवर्धन करणे आवश्यक आहे.

**IV) भूतापीय पाण्याचा उपयोग :-**

पृथ्वीच्या अंतर्गत भागात अधिक खोलीवर अशा प्रकारचे भूमिगत पाणी असते. या उष्ण पाण्याद्वारे भूतापीय विद्युत केंद्रातून सतत विद्युत निर्माण केली जाते. या उष्ण पाण्याचा उपयोग पशूधन प्रजनन केंद्रावर केला जातो. सैबेरियात या पाण्याचा उपयोग तलावात माशांच्या प्रजननासाठी केला जातो.

**V) प्रदूषणापासून पाण्याचे संरक्षण :-**

जगात लोकसंख्या वाढीमुळे आणि उद्योगधंदे, वाहतूक साधनांचा शीघ्र विकास झाल्यामुळे पाण्याचा फक्त उपयोगच वाढला असून पाण्याचे प्रदूषण देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे. समुद्रातील पाणी प्रदूषित होण्याचे मुख्य कारण म्हणजे तेलाच्या टँकरची वाहतूक, किनाऱ्यावरील तेल उत्पादक विहीरी, नद्याद्वारे घाण पदार्थाचे समुद्रात विसर्जन इ. प्रमुख कारणे आहेत. जलप्रदूषणाचा जास्त प्रभाव मासेमारीवर होत असतो. कारण अशा प्रदूषित पाण्यातून पकडलेले मासे खाण्यासाठी अयोग्य असतात. तसेच जहाजातून तेलगळती होऊ नये. तेलाचे टँकर समुद्रातील पाण्यात धुण्यास मनाई करावी.

**VI) प्रदूषित पाणी शुद्ध करावे :-**

जलसंवर्धन करण्यासाठी घाण पाणी शुद्ध करुन वापरात आणावे. घाण पाणी नदीत न सोडता ते शुद्ध करुन नदीत सोडावे. पाणी शुद्ध करण्याच्या अनेक पद्धती आहेत.

**१) यांत्रिक पद्धत :-**

या पद्धतीने पाण्यात मिसळलेले पदार्थ विशेष उपकरणाच्या साह्याने वेगळे केले जातात.

**२) भौतिक रासायनिक शुद्धीकरण पद्धती :-**

या पद्धतीत पाण्यातून कार्बनिक व अकार्बनिक पदार्थाचे मिश्रण वेगळे करण्यासाठी रासायनिक पदार्थाचा उपयोग केला जातो.

**VII)** खतरनाक अवशिष्ट पदार्थांना पृथ्वीच्या भूकवचात खोल सोडून देणे पूर्णपणे सुरक्षित नाही. कारण भूमिगत पाण्याच्या प्रवाहाबरोबर हे विषारी पदार्थ पृष्ठभागापर्यंत येत आहेत. म्हणून या हानिकारक अवशिष्ट पदार्थाच्या विंसर्जनासाठी काय करता येईल? यासाठीचे संशोधन कार्य चालू ठेवणे आवश्यक आहे.

**VIII)** इस्त्रायल, चीन, जपान या देशांनी अंगिकारलेल्या जलसंवर्धन पद्धतीचा आपण काटेकोरपणे वापर केल्यास पाण्याचा योग्य वापर होऊन पाण्याचे दुर्भिक्ष कमी होण्यास मदत होईल.

**IX)** पाण्याला राष्ट्रीय संपत्ती म्हणून घोषिंत केल्यास पाण्याचा दुरुपयोग करणाऱ्यास कडक शिक्षा करावी, त्यासाठी कडक कायदे करावेत, दंड करण्यात यावा याची जाणीव सर्वांनी करुन घ्यावी. यासाठी प्रसारमाध्यमातून पुढाकार घेऊन पाण्याचे महत्त्व सर्वांना समजावून दिले पाहिजे.

**X)** शेतीकरीता पाटाने पाणी दिल्याने खुप पाणी जमिनीत झिरपून पाण्याचा अपव्यय होतो. यासाठी ठिबक सिंचन पद्धत, मडका पद्धतीचा वापर करुन जलसंवर्धन करावे.

**XI)** पिकासाठी वापरावयाचे पाणी शुद्ध करुन जलाशयातून आणावे ते आणत असताना काळजी घ्यावी. नाही तर रस्त्यात पाईप फुटलेले असतात त्यातून बरेच पाणी वाया जाते व त्यात दुषित पाणी जाऊन रोगराई पसरण्याचा धोका असतो म्हणून याकडे जबाबदारीने लक्ष दिले तर ते जलसंवर्धन होईल.

**XII)** जलसंवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात सामाजिक जागृती करावी. त्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करावा.

**XIII)** प्रत्येकाने आपल्या घरासमोर रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे गरजेचे आहे. पावसाचे पडलेले पाणी आपण आपल्या घरासमोर टाक्यात साठवले तर त्याचा वापर आपल्याला करता येतो.

**XIV)** गावातील सर्वांनी एकत्र येऊन बंधारे बांधून बंधाऱ्यात पाणी साठवावे. याचे उदा. राळेगणसिद्धी.

**XV)** कोफी अनान, नेल्सन मंडेला, महात्मा गांधी या मोठ्या माणसांच्या जलसंवर्धन विषयक विचारांचा परामर्श घ्यावा व अण्णा हजारे-राळेगणसिद्धी, पोपट पवार-हिवरेबाजार, अमीर खान यांचे पाण्यासंबंधीच्या कार्याचे चिंतन करावे व पाण्याचे संवर्धन करणे स्वतः पासून सुरु करावे आणि मग इतरांना सांगावे.

**५) निष्कर्ष :-**

१. जंगलतोड थांबवून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे आवश्यक आहे.
२. शाळा महाविद्यालयातून भित्तीपत्रके, व्याख्यानमाला यातून जलसंवर्धनाचे महत्त्व सांगणे आवश्यक आहे.
३. वापरलेले पाणी पुन्हा वापरण्याची मानसिकता आपल्यात रुजली पाहिजे.
४. शहरी भागात पाणी पुरवठा यंत्रणेने प्रत्येक घरी मीटर बसवले तर पाण्याचा अतिरिक्त वापर थांबेल व संवर्धन होईल.
५. भविष्यातील पाणी टंचाईचे गांभीर्य लोकांना मनोमन पटेल म्हणून लोक पाण्याविषयी काळजी घेतील.
६. पाणी नसल्यानंतर कळणारं पाण्याच महत्त्व ते असल्यानंतर कळाल तर बर होईल.
७. पाण्याशिवाय मानवी जीवन नाही. पाणी ही निसर्गाने दिलेली संजिवनी आहे. म्हणून तिचा वापर जपूनच करावा लागेल. सांगितलेल्या उपायावरुन निश्चितच पाणी संवर्धन ही संकल्पना आज अभ्यासणे, त्यावर चिंतन करणे महत्त्वाचे आहे.

संदर्भ :-

१. पर्यावरण भूगोल - प्रा. शेटे, डॉ. केचे, डॉ. फुले, प्रा. शहापूरकर - अभिजीत पब्लिकेशन, लातूर.
२. पर्यावरण भूगोल - प्रा. शैलजा सांगळे - डायमंड पब्लिकेशन, पुणे.
३. पर्यावरण अभ्यास - सुहास पेशवे - मंजुषा पब्लिकेशन.
४. आपले पर्यावरण - डॉ. ललिता आगाशे.
५. वृक्षवेली - डॉ. दयानंद उजळंबे.
६. पर्यावरण भूगोल - डॉ. विठ्ठल घारपुरे.
७. पर्यावरण भूगोल - डॉ. वराट, प्रा. बोरुडे.
८. पर्यावरण भूगोल - प्रा. अहिरराव व इतर.

2019-20

# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020

Peer Reviewed International Refereed Research Journal








## शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

# "राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद



प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव

2019 - 20

37) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे कृषीविषयक विचार
प्रा.डॉ. सुधाकर वि. वनवे, बीड ||111

38) महात्मा ज्योतिबा फुले यांचे आर्थिक विचार : एक अभ्यास
कापसे महानंदा ज्ञानोबा ||113

39) फुले शाहु आंबेडकर यांची आरक्षण विषयक भुमिका
प्रा. मदन कचरु मगरे, जालना ||115

40) फुले, शाहु, आंबेडकर यांचे आर्थिक विचार
प्रा. किशन मिराशे, नांदेड ||117

41) राजर्षी शाहू महाराज यांचे जलव्यवस्थापन विषयक विचार व कार्य
प्रा. शिंदे नारायण भर्तरीनाथ, बीड ||119

42) महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य
प्रा. बोराडे तानाजी रामभाऊ, प्रा.लोंढे एस. के., भूम ||122

43) राजर्षी शाहू महाराज : प्रारंभिक राष्ट्रवादी नेते
डॉ. अर्चना टाक, लातूर ||126

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
प्रा.डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे, बीड ||128

45) महात्मा फुले यांचे शिक्षाविषयक विचार
जगदाळे नंदु रामभाऊ, अमरावती ||131

46) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार
प्रा.डॉ. संजय उत्तम बेंद्रे, रायगड ||133

47) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुसूचित जातीतील योगदान
आकांक्षा पहिलवान, अहमदनगर, ज्योती आढाव, औरंगाबाद ||136

48) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार
जनार्दन जानजी देवरे, जळगाव ||138

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

37

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे कृषीविषयक विचार

**प्रा.डॉ. सुधाकर वि. वनवे**
भूगोल विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

**************

**१. प्रस्तावना :-**

इतिहास काळात जी थोर माणसे होऊन गेली ज्यांनी इतिहासातच नाही तर भूगोलातही आपला ठसा उमटवला त्या ऐतिहासिक थोर पुरुषांच्या यादीत शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. शाहू महाराजांनी शोषित, दलित व सामान्य जनतेच्या उद्धारासाठी केलेले कार्य आज सुद्धा मार्गदर्शक ठरेल असे आहे. राजर्षी शाहू कर्मवीर होते. त्यांच्या कार्याला विचार आणि शिस्त यांची जोड होती. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता त्यांनी जे निर्णय घेतले ते त्या काळात योग्यच होते. कर्म हा माणसाचा अधिकार आहे. तोच ज्यावेळी ध्यास होतो तेव्हा निखळ परिणाम त्यातून प्रतित होतात. शाहू महाराजांनी राजसौख्यापेक्षा रयतेच्या सुख दु:खाशी समरस होण्यास महत्त्व दिले आणि त्यावेळेपासून एका समाज क्रांतीला प्रारंभ झाला. त्या क्रांतीचे परिणाम आजही उमटतांना दिसतात. ते ब्रिटिशांचे मांडलिक राजे होते म्हणून त्यांच्या कार्याला खुप मर्यादा होत्या. त्या मर्यादेत राहूनही त्यांनी केलेले कार्य व घेतलेले निर्णय विचार करण्यासारखेच आहेत. हे सर्व करत असतांना त्यांना कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले असेल याचा विचार न केलेला बरा. तरी विविध संकटांना तोंड देवून पुरुन उरलेला हा राजा कसलेला सेनानीच होता. ते बुद्धीमान, लढवय्या व मुत्सद्धी होते. तत्कालीन राजे आपल्या अंतर्गत राज्यातील कायदा व सुव्यवस्था एवढ्यापुरतेच मर्यादित होते. प्रजेच्या विकासाबाबत त्यांना तीळमात्र घेणे देणे नव्हते. समर्थ व दुबळा याचे त्यांना देणे घेणे नव्हते. शाहू महाराजांनी हे सर्व मोडीत काढून गरीब व श्रीमंत असा भेद न करता दुबळ्या घटकांना प्रेरणा देऊन त्यांना सुखी जीवन जगण्याचा मार्ग दाखविला. त्या परिस्थितीत शेती व शेतकरी यांना केंद्रस्थानी मानुन त्यांनी कार्य केले. त्यांनी त्या काळात शेतीविषयक मांडलेले विचार, घेतलेले निर्णय व केलेले कायदे आज देखील राज्यापुरते मर्यादित नसून देशाला विचार करायला लावणारे आहेत.

**२. उद्दिष्ट्ये :-**

अ. राजर्षी शाहू महाराजांच्या कृषी विषयक विचारांचा परामर्श घेणे.

ब. सद्यस्थितीत शाहू महाराजांच्या कृषी विषयक विचारांची उपयुक्तता तपासणे.

**३. संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी दुय्यम स्वरुपाची माहिती वापरलेली आहे. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य एक राजा म्हणून कोल्हापुर संस्थानापुरते मर्यादित असले तरी पूर्ण जगाने आदर्श घ्यावा असे आहे. यात फक्त त्यांच्या शेतीविषयक विचारांचा परामर्श घेतला आहे. शाहू महाराजांचा शिक्षण पूर्ण केल्यानंतर २ एप्रिल १८९४ रोजी वयाच्या २० व्या वर्षी राज्याभिषेक झाला. त्यांना कार्य करण्यासाठी फक्त २८ वर्षे मिळाली. त्यांचे विचार व कार्य हे विविधअंगी असून ते विविध ग्रंथ, भाषणे, वर्तमानपत्रातील विविध लेख, चर्चासत्रे इ. मधून त्यांच्या कृषीविषयक विचारांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न आहे.

**४. अल्पपरिचय :-**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जुन १८७४ साली कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडीलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व शाहू हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षाच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या श्रीमंत लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू महाराज विवाहबद्ध झाले. यावेळी त्यांचे वय १७ वर्षाचे होते तर लक्ष्मीबाईचे वय ११ वर्षाचे होते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्याभिषेक झाला. त्यावेळी ते २० वर्षाचे होते. इ.स. १९२२ पर्यंत ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. म्हणजे त्यांनी २८ वर्षे राज्य केले. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.

**५. शाहू महाराज यांचे कृषीविषयक विचार :-**

आपल्या कोल्हापुर संस्थानातील शेतकरी दारिद्र्य व अज्ञानामुळे पिचला आहे, तो सरकारच्या ओझ्याखाली दबला आहे. शेतकरी सावकारीतून मुक्त झाला पाहिजे. शेतीतील अधिक उत्पादन वाढीसाठी व शेतकऱ्यांचे दारिद्र्य नष्ट होण्यासाठी शेतीमध्ये सुधारणा व शेतीस पाणी पुरवठा झाला पाहिजे. शाहू महाराजांचा राज्याभिषेक होताच त्यांचे विचार वरीलप्रमाणे कृषीविषयक धोरणाकडे धाव घेत होते.

**I.** १८९७ सालच्या दुष्काळाची झळ संस्थानाला लागली होती. त्यातुन मार्ग काढण्यासाठी महाराजांनी मोठ्या प्रमाणात कामे काढली. अन्नछत्रे सुरु केली. शेतकरी सावकारी पाशात अडकला होता. त्याला कर्जे दिली व त्यांची जमीन सावकाराकडून सोडवून घेतली. शेतकऱ्यांच्या जनावरांची महाराजांनी काळजी घेतली. त्यांना चारा व पाण्याची सोय करुन जंगले खुली केली. शेतसाऱ्यात सुट दिली.

**II.** शेतकरी शेतीमध्ये नियमित घेत असलेल्या पिकापेक्षा वेगळेपणा म्हणून सन १९०८ साली महाराजांनी चहाची लागवड केली. तसेच रेशीम मिळविण्यासाठी तुतीच्या लागवडीचा प्रयत्न केला. पन्हाळ्याच्या परिसरात कॉफीच्या लागवडीचा प्रयोग त्यांनी यशस्वी केला. तसेच त्यांनी वाखासाठी अंबाडीची लागवड केली. अशा विविध प्रकारच्या नगदी पिकाची उत्पादने घेऊन शेतकऱ्यांचे दारिद्र्य कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न महाराजांनी केला. जो प्रयोग आज पूर्ण देशामध्ये करण्याचा प्रयत्न होत आहे.

**III.** सन १९१८ साली कुलकर्णी वतने नाहीशी करण्याचा कायदा केला. जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना वतनदारी, इनामदारी जाचक ठरत होती. कुलकर्णी व इनामदार हा वर्ग शेतकऱ्यांची पिळवणूक करत होता. या कायद्यापुरते महाराजांनी कुलकर्ण्याकडील काम काढले व ते त्यांनी तलाठ्याकडे दिले. त्यांनी आता तलाठी पद्धती सुरु केली. या कायद्याविषयक कुलकर्णी वर्गाने फार मोठे आंदोलन सुरु केले. त्याकाळात निघत असलेल्या जातीनिष्ठ वृत्तपत्रात महाराजांच्यावर मोठ्या प्रमाणात टिका झाली. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. उलट हा कायदा स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही सरकारलाही पसंत पडला. मुंबई सरकारने सन १९५० पासून मुंबई प्रांतात कुलकर्णी वतने नष्ट करण्याचा कायदा केला आणि त्यामुळे १ मे १९५१ पासून मुंबई प्रांतात कुलकर्णी वतन नष्ट झाले, तलाठी पद्धती सुरु झाली. यावरुनच असे म्हणता येईल भविष्यकालीन प्रगतीचा अचूक वेध महाराजांना होतो, म्हणूनच ते द्रष्टे होते हे स्पष्ट होते.

**IV.** शाहू महाराजांनी महार वतने नष्ट केली. त्यावेळी गुलामाप्रमाणे उपयोग करुन घेण्यासाठी ग्रामीण भागात महार वतने होती. या वतनासाठी महारांना जनावराप्रमाणे वागवले जात असे हे महाराजांनी बंद केले. त्यांच्या जमिनी रयतावा केल्या. त्यांच्याकडून सक्तीने काम करुन घेण्यास महाराजांनी २५ जुन १९१८ रोजी कायद्याने बंदी केली. त्याचवेळी बलुतेदारी पद्धतीनेही थैमान घातले होते. ही पद्धत बंद करण्याचा कायदा सन १९१९ साली महाराजांनी केला. यावरुन असे दिसते की, महाराजांनी मजुरापासून मोठ्या शेतकऱ्यापर्यंत स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला व तो कमालीचा यशस्वी झाला. आता शेतकरी सावकारी पाशातून मुक्त होऊन शेतीमध्ये आनंदाने कष्ट करु लागला.

अशी पार्श्वभूमी तयार झाल्यानंतर कृषीमध्ये उत्पन्न वाढवायचे असेल तर त्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे हे हेरुन महाराजांनी आपल लक्ष तिकडे लावले.

**V.** राधानगरी तलावाचे बांधकाम केले. जमिनीला पाणीपुरवठा करण्यासाठीच्या योजना आखण्याचे महाराजांच्या विचारधीन असतांना कोल्हापूरच्या पश्चिम दिशेस ३५ मैलावर भोगावती नदीला बंधारा बांधवा अशी मोठी योजना सन १९०७ साली महाराजांनी आखली. त्यासाठी विचार विनिमय सुरु झाला. जागेची पाहणी करुन १९०८ साली पाणीपुरवठ्याचे दृष्टीने या धरणाचे काम सुरु झाले. श्रीमंत बापुसाहेब महाराज यांचे नियंत्रणाखाली काम सुरु झाले. हे धरण बांधतांना महाराजांना खुप कष्ट पडले. कारण हे धरण बांधत असतांना अनेक मत मतांतरे झाली. पण महाराज मागे सरले नाहीत. त्यांनी चिकाटीने काम सुरु ठेवले. सन १९१७ पर्यंत हे धरणाचे काम बरेच पूर्ण झाले. याला २६ लाख रुपये खर्च झाले होते. यानंतर आर्थिक संकटामुळे महाराजांना हे काम बंद ठेवावे लागले. नंतरच्या काळात छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळात १९५८ साली हे काम पूर्ण झाले.

या धरणामुळे शेतीस मोठ्या प्रमाणात पाणी मिळू लागले. शेतकरी सधन होऊ लागला. ऊसाचे क्षेत्र वाढले. पैसा मोठ्या प्रमाणात मिळू लागला. भोगावतीचा काठ म्हणजे हरितक्रांतीचाच भाग झाला. त्यातून मोठ्या प्रमाणात विद्युत निर्मिती होऊ लागली. कोल्हापूर संस्थानातील अनेक मोठ्या गावांना याच धरणाची वीज पुरविली जात होती. या धरणातून सांगली, मिरज, ईस्लामपूर या भागास वीजपुरवठा करण्यात येत होता. हे धरणाचे पाणी नदीच्या खालच्या बाजूस पाटबंधाऱ्यासाठी उपयोगात आणले जात आहे. याशिवाय महाराजांनी पाणीपुरवठ्यासाठी अनेक योजना आखल्या होत्या त्या आता साकार होत आहेत.

सध्या कोल्हापूरचा शेतकरी समृद्ध होत आहे. कारण कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वच लहान मोठ्या नद्यांवर अनेक धरणे बांधली आहेत. चोहोंकडे बागायती शेती दिसत आहे. शेतकरी आनंदी आहे. सारा भारत देश कौतुकाने याकडे पाहात आहे.

शेतकरी सावकारी पाशातून मुक्त करुन शेतीला पाणीपुरवठ्याच्या सुविधा झाल्यानंतर शेतीमालाला बाजारपेठ आवश्यक होती. तेथेही महाराजांनी व्यवस्था केली होती. ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणात येत होते. त्यापासून गुळ तयार होऊ लागला. म्हणून यापूर्वीच त्यांनी १८९५ साली शाहूपुरी व्यापारपेठेची स्थापना केली होती. पुढे त्याचे रुपांतर शाहू मार्केडयार्ड मध्ये झाले. आज मोठ्या प्रमाणात कोल्हापूर जिल्ह्यात व महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साखर कारखाने दिसतात. विशेषतः ही कारखाने सहकारी तत्त्वावर आहेत ते अत्यंत यशस्वीरित्या वाटचाल करत आहेत. याची बीजे मात्र शाहू महाराजांनी त्याच काळात रुजवली होती.

**६. संदर्भ ग्रंथ :-**

१. छत्रपती राजर्षी शाहू महाराज - तु.बा. नाईक - मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे.
२. बहुजनाचे देव आणि त्यांचे दुश्मन - ज्ञानेश महाराव - दर्पण प्रकाशन, मुंबई.
३. राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे - संकलन व संपादक शाम एडेकर - आ. १९७१.
४. प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती - व्याख्याने - धनंजय कीर - १९७०.
५. बहुजन समाजाचे शिल्पकार - माधवराव बागल.